अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | मंगळवार
१४.०७.२०२६
# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: १६४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### नवविवाहितेचा अपघाती मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – लग्नानंतर माहेरी निघालेल्या नवविवाहितेचा सोमवारी जळगाव शहरात भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत जागीच मृत्यू झाला, तर तिला माहेरी घेऊन जाण्यास आलेले तिचे काका या अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालयात उपचार सुरू आहेत.

नवविवाहिता वैशाली भाऊसाहेब पाटील हिचा विवाह ७ जुलै रोजी पोलीस कर्मचारी विजय काशिनाथ पाटील यांच्याशी मोठ्या उत्साहात पार पडला होता. विवाहानंतर नवदांपत्य देवदर्शनासाठी गेले होते आणि काही दिवसांपूर्वीच ते घरी परतले होते.

## राज्यातील बांधकाम कामगारांसाठी फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

# कामगारांच्या मृत्यूनंतर कुटुंबाला मिळणार साडेसहा लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील बांधकाम कामगारांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. बांधकाम कामगारांसाठी फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला असून बांधकाम कामगारांच्या मृत्यूनंतर कुटुंबाला आत आर्थिक सहाय्य मिळणार आहे. राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या विभागाकडून या संदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. तर नैसर्गिक मृत्यू झाल्यास कुटुंबाला ३ लाख ५० हजार रुपयांची मदत मिळणार असल्याची माहिती आहे. बांधकाम कामगारांच्या अपघाती



मृत्यू झाल्यास कुटुंबाला ६ लाख ५० हजार रुपयांची मदत मिळणार आहे. तर दिव्यांग झाल्यावर कामगारांना २ लाख रुपयांचे सहाय्य मिळणार असल्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दरम्यान या निर्णयामुळे राज्यातील कामगारांना मोठा दिलासा मिळणार असून या निर्णयाचे स्वागत केलं जात आहे.

बांधकाम कामगार हा समाजातील अंतिम घटक, त्याच्या घराला आधार देण्याचा सरकारचा निर्णय दरम्यान, या विषयी बोलताना राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले कि, बांधकाम कामगार हा समाजातील अंतिम घटक आहे. अपघात झाला तर त्या घराला आधार दिला पाहिजे. म्हणून नैसर्गिक मृत्यूसाठी मदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. नैसर्गिक मृत्यूसाठी साडेतीन लाख, अपघाती मृत्यूसाठी साडेसहा लाख, अपंगत्व आले तर २ लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय निवृत्तीनंतर वेतन देण्याचा निर्णय घेत आहोत.

तर नोंदणी करताना ग्रामसेवक पत्र लागायचे, ग्रामसेवकांनी नकार दिल्याने कंत्राटदारांना द्यायला सांगितले. तसेच तहसीलदार व इतर यंत्रणांच्या मदतीने हे प्रमाणपत्र देत आहोत. अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली आहे.

# ‘अनधिकृत होर्डिंग्ज हटवा’

## बॅनर दुर्घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** – ठाण्यातील तीन हात नाका परिसरात पादचारी पुला-वरील वाढदिवसाचा मोठा बॅनर धावत्या दुचाकीस्वाराच्या डोक्यावर कोसळल्याचा थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने दखल घेत शहरातील बेकायदा होर्डिंग्ज हटवण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मोठ्या फलकांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देशही त्यांनी ठाणे महापालिकेला दिले आहेत.

बॅनर दुर्घटनेनंतर तातडीने निर्णय मंगळवारी पूर्व द्रुतगती महामार्गावरील तीन हात नाका परिसरात पादचारी पुलावर लावलेला वाढदिवसाचा मोठा बॅनर अचानक तुटून थेट धावत्या



दुचाकीस्वाराच्या डोक्यावर कोसळला होता. प्रसंगावधान राखल्यामुळे दुचाकीस्वार बचावला आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता.

या घटनेनंतर शहरातील बेकायदा होर्डिंग्ज आणि मोठ्या जाहिरात फलकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला तातडीने कारवाईचे निर्देश दिले. आयुक्तांशी दूरध्वनीवरून चर्चा

’मिड डे’ च्या वृत्तानुसार, दुर्घटनेनंतर एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिका आयुक्तांशी दूरध्वनीवरून चर्चा करत परिस्थितीचा आढावा घेतला. शहरातील बेकायदा होर्डिंग्जविरोधात विशेष मोहीम राबवून ती तातडीने हटवावीत, तसेच मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यांमुळे धोकादायक ठरू शकणाऱ्या मोठ्या फलकांची संरचनात्मक तपासणी (स्ट्रक्चरल ऑडिट) तातडीने करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

# एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

*** ‘झाडे लावा, झाडे जगवा : पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी’ - परिवहन मंत्री सरनाईक**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्या विहार येथील विभागीय कार्यालयातून राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी स्थानिक आमदार दिलीप लांडे, उपाध्यक्ष



व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या सह महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. राज्यभरातील एसटीची बसस्थानके, आगारे, कार्यालये आणि विविध परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून भावी पिढ्यांसाठी हिरवा, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याचा सामूहिक संकल्प आहे. वाढते जागतिक तापमान, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि उष्णतेच्या लाटांसारख्या पर्यावरणीय संकटांचा सामना करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे असून ती प्राणवायू पुरवतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील अनेक संकटांवर उपाय उभा करणे होय, असेही त्यांनी सांगितले एसटी महामंडळ हे केवळ प्रवाशांना सेवा देणारे परिवहन माध्यम नसून समाजाशी नाळ जोडलेली सामाजिक संस्था आहे.

# सोमठाणे घाटात प्रवाशांनी भरलेली बस उलटल्याने भीषण अपघात


(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – येवला-नांदगाव मार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. येवला-नांदगाव मार्गावरील सोमठाणे घाटात आज (मंगळवारी) सकाळी मध्य प्रदेशातील एक खाजगी लक्झरी बस चालकाचे नियंत्रण सुटून उलटल्याने भीषण अपघात घडला आहे. या भीषण अपघातात एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला आहे तर २५ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघात




झालेली खाजगी लक्झरी ट्रॅव्हल्स बस मध्यप्रदेशातील असून, ती २५ ते ३० प्रवाशांना घेऊन जात होती. मंगळवारी पहाटेच्या सुमारास बस सोमठाणे जोश घाटातून जात असताना अचानक चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. गाडीचा वेग अधिक असल्यामुळे भरधाव वेगातील ही बस थेट रस्त्यावरच पलटी झाली.




# फडणवीसांनी मोडला पवारांचा विक्रम

## सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पद भूषविणाऱ्यांच्या यादीत तिसऱ्या स्थानी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्रीपद भूषविर्णाया नेत्यांच्या यादीत देवेंद्र फडसवीस हे आता तिर्सया स्थानी पोहोचले आहेत. याआधी हा विक्रम शरद पवारांच्या नावे होता. फडणवीसांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीला २ हजार ४३० दिवस पूर्ण झाले आहेत. तर, शरद पवारांच्या मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द ही एकूण २ हजार ४१२ दिवसांची राहिली आहे. देवेंद्र फडणवीस



हे महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक काळ राहिलेले तिसरे मुख्यमंत्री ठरले आहेत. यापूर्वी या स्थानावर शरद पवारांचे नाव होते. देवेंद्र फडणवीस यांनी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिल्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर पुढील पाच वर्षे सलग मुख्यमंत्रीपदावर राहून त्यांनी या पदाचा कार्यकाळ पूर्ण केला. त्यानंतर, राज्याच्या राजकीय इतिहासात गाजलेल्या ‘पहाटेच्या शपथविधी’नंतर २३ नोव्हेंबर २०१९ ला ते दुर्सयांदा मुख्यमंत्री पदावर आले. मात्र, त्यांना अवघ्या काही दिवसांत राजीनामा द्यावा लागला.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर ५ डिसेंबर २०२४ रोजी फडणवीस हे तिर्स?यांदा महाराष्ट्राचा मुख्यमंत्रीपदी आरूढ झाले.



## तांदुळवाडी किल्ल्याजवळ दरड कोसळली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पालघर** - पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तांदुळवाडी किल्ल्याकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर दरड कोसळल्याची घटना घडली आहे. त्यामुळे किल्ल्याकडे जाणारा रस्ता धोकादायक बनला असून, पुढील काही दिवस पर्यटक आणि ट्रेकर्सनी तांदुळवाडी किल्ल्याला भेट देणे टाळावे, असे महत्त्वाचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# हेअर कटिंगच्या वादातून तरुणावर मारहाण : वरुड पोलिसांत गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - शहरातील श्रीराम कॉम्प्लेक्स परिसरातील एका हेअर कटिंग सलूनमध्ये कटिंगच्या कारणावरुन झालेल्या किरकोळ वादाचे रुपांतर मारहाणीत झाले. या प्रकरणी वरुड पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सुत्रांनी माहिती दिलेल्या नुसार, ११ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता श्रीराम कॉम्प्लेक्स परिसरातील सलूनमध्ये फिर्यादी कटिंगसाठी गेले असता आरोपींशी शाब्दिक वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या तोंडावर थपडा व मुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या नाकातून रक्तस्राव झाला, गाल सुजला तसेच उजव्या खांद्यावर खरचटल्याची दुखापत झाली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी आदित्य रविकांत चौधरी (१८) याच्यासह अन्य दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा क्रमांक ३९७/२०२६ दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# महेंद्री बसस्टॉपजवळ रेतीची चोरी करणारा डंपर जप्त : तिघांविरुद्ध गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** - तालुक्यातील महेंद्री बसस्टॉप परिसरात अवैध रेती वाहतूक व चोरीप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत रेतीने भरलेला डंपर जप्त केला असून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रांनी माहिती दिलेल्या नुसार, १२ जुलै रोजी पहाटे मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे महेंद्री बसस्टॉप परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी रेतीने भरलेला डंपर अडवून तपासणी करण्यात आली. चालकाकडे रेती वाहतुकीसाठी कोणताही वैध परवाना अथवा कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. चौकशीदरम्यान सदर रेती चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी हरिष गोहाड (४५) अनिकेत रविंद्र ढोंगे (२६) आणि विजय महेश कोसे (२६) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी अंदाजे २० लाख रुपये किमतीचा डंपर व सुमारे ४० हजार रुपये किमतीची रेती असा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी गुन्हा क्र. २३२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ४९ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम व महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरु आहे.

## वाढत्या अन्नधान्याच्या किमतीचा सामान्यांना फटका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** - अन्नधान्य महागल्यामुळे जून महिन्यात किरकोळ महागाईचा दर ४.३८ टक्क्यांवर पोहोचला आहे. या वाढीमुळे किमती वाढीचा दर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्क्यांच्या मध्यवर्ती लक्ष्याच्या वर गेला आहे.

या वर्षी जानेवारीपासून अंमलात आलेल्या नवीन मालिके अंतर्गत किरकोळ महागाईने ४ टक्क्यांचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ आहे. या नवीन मालिकेचे पायाभूत वर्ष २०२४ आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जारी केलेल्या ग्राहक किंमत निर्देशांक आकडेवारीनुसार, जूनमध्ये सीपीआय-आधारित महागाई मे महिन्यातील ३.९३ टक्क्यांवरून वाढून ४.३८ टक्के झाली आहे. एनएसओच्या आकडेवारीनुसार, जूनमध्ये सर्वाधिक महागाई असलेल्या पहिल्या पाच वस्तूंमध्ये चांदी, सोने, हिरे आणि प्लॅटिनमचे दागिने; अद्रक, टोमॅटो, आणि बेदाणे व मनुका यांचा समावेश होता.

तर सर्वात कमी महागाई असलेल्या पहिल्या ५ वस्तूंमध्ये बटाटा, मटार, मोटर कार आणि जीप, जिरे, आणि मोटरसायकल व स्कूटर यांचा समावेश होता.

### बेनोडा शहीद न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल येथील

# आर्या ही शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तालुक्यातून द्वितीय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल बेनोडा शहीद येथील विद्यार्थिनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये यशस्वी झाली आहे. वर्ग ८ वी मधील आर्या अमोल निंभोरकर ही विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तालुक्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

गुणवत्ता धारक विद्यार्थिनीचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केल्या जात आहे. या गुणवंत विद्यार्थिनीचे गुरु सेवा शैक्षणिक विकास संस्थेचे अध्यक्ष अमोल निंभोरकर, उपाध्यक्ष पंकज गोहाड, सचिव स्वाती निंभोरकर व संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक हर्षल झोड, न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल बेनोडा शहीद येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनीचे कौतुक केले आहे.



# पुसला मार्गे लोहद्रा बसफेरी सुरु करा

### पुसला युवा मित्र मंडळ पदाधिकाऱ्यांची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - लोहद्रा हे गाव पुसला गावापासून ४ किमी अंतरावर असून जंगल लगत आहे. याच रस्त्याने जंगली प्राण्यांचा वावर आहे. विद्यार्थी, वृद्ध, नागरिक, रुग्ण यांना पुसला गावापर्यंत पायदळ प्रवास करावा लागतो आणि पुसल्यावरून वाहन घेऊन वरुडचा प्रवास करावा लागतो. शाळा, कॉलेज, दवाखाने, बाजार तालुक्याला असल्यामुळे रुग्ण, विद्यार्थी, नागरिक याना प्रवास दरम्यान आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. या आधी तत्कालीन आगार प्रमुख जीवन वानखडे यांनी निवेदनाची दखल घेऊन वरुड-लोहद्रा मार्ग पाहणी करीता संबंधित अधिकाऱ्यांना पाठवले असता रस्ता अरुंद आहे असे सांगण्यात आले.परंतु आता त्या रस्त्याचे काम होऊन रस्ता रुंद करण्यात आला आहे. त्यामुळे आता आपण लवकरात लवकर वरुड-लोहद्रा बसफेरी सुरु करावी असे निवेदन युवा मित्र मंडळ, पुसला तर्फे आगार व्यवस्थापक, वरुड यांना देण्यात आले.

यावेळी युवा मित्र मंडळ, पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, सचिन ढोके, विलास मरकाम, प्रमोद पाटील, नितीन सावले, तुषार इवनाते, राहुल देशमुख, रोशन उईके, पियुष कोकाटे,शिवम आहाके, माधुरी देशमुख, निकिता खवसे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

### नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये

# पालक-शिक्षक मेळावा उत्साहात संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - नॅशनल इंग्लिश स्कूल येथे नुकताच पालक-शिक्षक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याला शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती, शिस्त, अभ्यास आणि सहशालेय उपक्रमांबाबत माहिती दिली. पालकांनी देखील शाळेच्या विकासासाठी उपयुक्त सूचना मांडल्या. मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शाळा आणि घर यांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे, यावर सर्वांनी भर दिला. पालकांचा सकारात्मक प्रतिसाद आणि सहभागामुळे हा मेळावा यशस्वी झाला.

### उत्क्रांती शिक्षण संस्थेच्या कौसल्याबाई वानखडे सभागृहात

# मुख्यमंत्री युवा कार्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - उत्क्रांती शिक्षण संस्थेच्या कौसल्याबाई वानखडे सभागृहात १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुख्यमंत्री युवा कार्य मेळावा व पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अमरावती जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना नामांकित कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीद्वारे रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून पात्र उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेणार आहेत. या मेळाव्यात १८ ते ३५ वर्षे वयोगटातील १० वी, १२ वी, पदवीधर तसेच आयटीआय उत्तीर्ण युवक-युवतींनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी हा मेळावा महत्वाची संधी ठरणार असून परिसरातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

### जुने मीटर बसविण्याची व वीजबिलात ५० टक्के सवलतीची मागणी

# सुरळी ग्रामस्थांचे स्मार्ट वीज मीटरविरोधात निवेदन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - तालुक्यातील सुरळी येथील ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी चे सहायक अभियंता यांना निवेदन देऊन गावात बसविण्यात आलेले स्मार्ट वीज मीटर काढून त्याऐवजी पूर्वीचे वीज मीटर बसविण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत सुरळी हद्दीत जुने वीज मीटर काढून नागरिकांची पूर्वपरवानगी न घेता स्मार्ट वीज मीटर बसविण्यात आले. मात्र, कमी प्रमाणात वीज वापर होत असतानाही नागरिकांना मोठ्या प्रमाणात वीजबिले येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

ग्रामस्थांनी स्मार्ट मीटर हटवून जुने मीटर पुन्हा बसविण्यात यावेत, आलेल्या वीजबिलात ५० टक्के सवलत द्यावी तसेच वीज युनिटचे दर सर्वसामान्यांना परवडतील अशा पद्धतीने समान व वाजवी ठेवावेत, अशी मागणी केली आहे.

वाढत्या वीजबिलांमुळे शेतकरी व मजूर वर्गाची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. याशिवाय, मागण्यांची दखल न घेतल्यास सर्व ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी किशोर हेलोडे, किशोर चंबोळे, नितीन नथिले, दिगंबर निकम, शंतनु खोरगडे, राजेंद्र बहुरुपी यांच्यासह समस्त सुरळी ग्रामस्थ उपस्थित होते.

या निवेदनाच्या प्रती वरुड-मोर्शी मतदारसंघाचे आमदार उमेश यावलकर, महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री, वरुडचे तहसीलदार तसेच अमरावती जिल्हाधिकारी यांनाही माहितीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

# प्रेरणादायी शनिवार उत्साहात साजरा

### स्व.केशवरावजी क्षीरसागर जागृत विद्यालय लोणीचा स्तुत्य उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**लोणी** - जागृत नवयुवक शिक्षण संस्था वरूड द्वारा संचालित स्व.केशवरावजी क्षीरसागर जागृत विद्यालय लोणी येथे विविध क्षेत्रातील अनुभवी ,विचारवंत, मार्गदर्शक यांना निमंत्रित करून विद्यार्थ्यांना नवी दिशा देण्याकरिता प्रेरणादायी शनिवारचे आयोजन करण्यात आले होते.

यात प्रसंगी वक्तृत्व, चित्रकला, निबंध, वादविवाद, काव्य, साहित्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रात राष्ट्रीय स्तरापर्यंत नैपुण्यप्राप्त माजी विद्यार्थिनी अँड.प्रिया खेरडे या प्रमुख वक्त्या म्हणुन उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पी.टी.मुंदाणे तर प्रमुख अतिथी म्हणुन प्रदीप खेरडे, छाया खेरडे, निळकंठ नेरकर, अजिंक्य मालपे, हर्षाली नेरकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीताई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी प्रार्थना गाऊन वातावरण मंत्रमुग्ध केले. पाहुण्यांचा परिचय निळकंठ नेरकर यांनी करून दिला. त्यानंतर अँड.प्रिया खेरडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना काळाची पाऊले ओळखून स्वत:ला सिद्ध करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून पी. टी. मुंदाणे यांनी विद्यार्थ्यांसाठी आज अशा उपक्रमांची नितांत गरज आहे.असे मत मांडले. प्रिया खेरडे यांचे कौतुक करून आपल्या शाळेचा अभिमान असल्याचे व्यक्त केले. तिला तिचे आईवडील यांच्या समक्ष शाळेच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वैशाली लाड तर आभार रंजना काळकर यांनी मानले. यासप्रसंगी शाळेचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# संपादकीय

{ शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे. }

## भारत-जपान मैत्री: समान मूल्यांचा आणि जागतिक स्थैर्याचा भक्कम पाया

नवी दिल्ली आणि टोकियो यांच्यातील संबंधांचा विचार केला, तर तो केवळ दोन देशांमधील व्यापारी करार किंवा लष्करी सहकार्यापुरता मर्यादित नाही. हा एका अशा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा प्रवास आहे, जो आता आधुनिक युगात अधिक प्रगल्भ झाला आहे. भारताचे पंतप्रधान आणि जपानचे राष्ट्रप्रमुख यांच्यातील सातत्यपूर्ण बैठका, 'क्वाड' सारख्या व्यासपीठांवरील एकत्र येणे आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील वाढती भागीदारी या गोष्टी याचेच संकेत देतात की, हे संबंध केवळ दोन देशांच्या 'सामरिक हितसंबंधांवर' आधारित नाहीत. या भागीदारीचा आत्मा अधिक खोलवर रुजलेला आहे, ज्याचा पाया लोकशाही, कायद्याचे राज्य, मुक्त व्यापार, शांततापूर्ण सहअस्तित्व आणि नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था या समान जीवनमूल्यांवर उभा आहे. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक बंध भारत आणि जपानमधील संबंधांची मुळे शतकानुशतके मागे जातात. बौद्ध धर्माचा भारतातून जपानमध्ये झालेला प्रसार हा या दोन्ही संस्कृतींना जोडणारा सर्वात जुना आणि मजबूत दुवा आहे. हा केवळ धार्मिक प्रसार नव्हता, तर ती विचारांची, तत्त्वज्ञानाची आणि शांततेच्या संदेशाची देवाणघेवाण होती. विसाव्या शतकात, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यादरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस आणि 'आझाद हिंद सेने'ला जपानने दिलेले सहकार्य हा राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर, जेव्हा जागतिक राजकारण बदलत होते, तेव्हा भारताने जपानशी अत्यंत सन्मानपूर्वक संबंध प्रस्थापित केले. जपानच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवणारा भारत हा सुरुवातीच्या देशांपैकी एक होता. आज एकविसाव्या शतकात, हाच ऐतिहासिक विश्वास एका नव्या सामरिक आणि आर्थिक भागीदारीत परावर्तित झाला आहे. समान मूल्ये: भागीदारीचे मुख्य स्तंभ आजच्या अस्थिर जागतिक वातावरणात भारत आणि जपानमधील भागीदारी अधिक मजबूत होण्याचे कारण म्हणजे दोन्ही देशांची काही मूलभूत तत्त्वांवरील अढळ श्रद्धा. हे स्तंभ खालीलप्रमाणे आहेत: लोकशाही आणि कायद्याचे राज्य: भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे, तर जपान ही आशियातील सर्वात यशस्वी आणि प्रगत लोकशाही आहे. दोन्ही देश व्यक्तीस्वातंत्र्य, मानवाधिकार आणि न्यायव्यवस्थेच्या सार्वभौमत्वाचा आदर करतात. ज्या काळात जगात हुकूमशाही आणि विस्तारवादी प्रवृत्ती डोके वर काढत आहेत, अशा वेळी दोन मोठ्या लोकशाही देशांचे एकत्र येणे जागतिक समतोलासाठी अत्यंत गरजेचे आहे. मुक्त व्यापार आणि आर्थिक सहकार्य: जपानने भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. 'मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल' (बुलेट ट्रेन), 'दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर' आणि देशातील विविध शहरांमधील मेट्रो प्रकल्प हे जपानी तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचे उत्तम नमुने आहेत. दोन्ही देशांचा असा विश्वास आहे की, व्यापार हा कोणत्याही एका देशाच्या मक्तेदारीखाली नसावा, तर तो मुक्त, पारदर्शक आणि सर्वांसाठी समान संधी देणारा असावा. शांततापूर्ण सहअस्तित्व आणि प्रादेशिक अखंडता: 'वसुधैव कुटुंबकम्' मानणारा भारत आणि युद्धाची दाहकता अनुभवून शांततेचा मार्ग निवडणारा जपान, या दोन्ही देशांचे उद्दिष्ट जागतिक शांतता हेच आहे. कोणत्याही देशाच्या भौगोलिक सीमांचा आदर केला पाहिजे आणि वाद हे युद्धाने नव्हे, तर संवादाने सुटले पाहिजेत, यावर दोन्ही देशांचे एकमत आहे. इंडो-पॅसिफिक क्षेत्र आणि नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीत 'इंडो-पॅसिफिक' क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या सागरी क्षेत्रातील शांतता आणि सुरक्षा संपूर्ण जगाच्या व्यापारासाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे. या भागात वाढणारी लष्करी आक्रमकता आणि आंतरराष्ट्रीय नियमांना धाब्यावर बसवण्याचे प्रयत्न रोखण्यासाठी भारत आणि जपान एकत्र आले आहेत. दोन्ही देशांनी 'मुक्त आणि खुल्या इंडो-पॅसिफिक'ची संकल्पना मांडली आहे. ही संकल्पना कोणत्याही एका देशाच्या विरोधात नसून, ती आंतरराष्ट्रीय कायद्यांवर आधारित सागरी वाहतुकीचे स्वातंत्र्य राखण्यासाठी आहे. 'क्वाड' संघटनेच्या माध्यमातून भारत, जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया हे देश एकत्र येऊन या भागात आपत्ती व्यवस्थापन, सागरी सुरक्षा, आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य करत आहेत. ही भागीदारी दर्शवते की, जेव्हा समान विचारांचे देश एकत्र येतात, तेव्हा ते केवळ स्वतःचा विचार करत नाहीत, तर संपूर्ण क्षेत्राच्या कल्याणाचा विचार करतात. आर्थिक भागीदारी आणि भविष्यातील आव्हाने जपानकडे प्रगत तंत्रज्ञान, आर्थिक भांडवल आणि कार्यक्षमता आहे, तर भारताकडे अफाट मनुष्यबळ, मोठी बाजारपेठ आणि तरुणाईची ऊर्जा आहे. हे दोन्ही देश एकमेकांना पूरक आहेत.

# वारी: देहाकडून विदेही अवस्थेकडे नेणारा एक महाप्रवास!

भौतिक जगातील सर्व सुख-दुःख ओलांडून, त्या जगन्नियंत्या परब्रह्माशी एकरूप करणारी आणि आध्यात्मिक परमानंदाची अनुभूती देणारी जगातील सर्वश्रेष्ठ परंपरा म्हणजे 'वारी'! वारीमध्ये जात, पात, धर्म, लिंग, वय, पद किंवा पैसा इत्यादी भौतिक गोष्टी आपोआप गळून पडतात. तिथे उरतो तो फक्त आणि फक्त एक 'आत्मीक जिव्हाळा'!

वारीमध्ये जेव्हा एक वारकरी आपल्या पात्रातील भाकर दुसऱ्या भुकेलेल्या माऊलीला देतो, तेव्हा 'तो माझ्या भावकीतील किंवा ओळखीचा आहे की नाही,' हा विचार शिवतही नाही! तिथे भक्ताला दुसऱ्या भक्तामध्ये फक्त साक्षात पांडुरंग दिसतो. तिथे एकमेकांचे पाय दाबताना 'ही स्त्री आणि हा पुरुष'... या देहाच्या मर्यादित आणि संकुचित कल्पना एका क्षणात नष्ट होतात! वारकरी देवाकडे काय मागावे'' या मानसिक विंचनेत कधीच नसतो; कारण 'माझे काहीच नाही आणि मी कोणीच नाही' (अहं शून्यता), ही सर्वोच्च भावना त्याच्या अंतःकरणात अत्यंत दृढ असते!

काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे षड्रिपू वारीत मुद्दामहून सोडावे लागत नाहीत महाराज; तर ते साक्षात पांडुरंगाच्या भक्तीरसात आपोआप गळून पडतात! जसे प्रचंड वाढलेल्या वटवृक्षावरून जुनी, पिवळी झालेली पाने निसर्गाच्या नियमानुसार सहजपणे गळून




पडतात... अगदी तसेच सहज, सुंदर आणि अत्यंत नैसर्गिक पद्धतीने मानवी मनातील अहंकार गळून पडतो!

वारीमध्ये पांडुरंग हा कोणी दूर आकाशात बसलेला देव नाही; तो सखा आहे, मित्र आहे, तर कधी आई-बाप आणि लहान मुलगाही आहे! तिथे सगळीकडे फक्त अथांग 'आदर' असतो, कोणतीही भीती किंवा कुतर्क नसतो. त्यामुळे त्या विठ्ठलाशी बोलताना मुखातून आपोआप फक्त 'तू' हीच प्रेमळ भाषा येते! हा मानवी नातेसंबंधांच्या पलीकडचा, कधीही न तुटणारा एक अद्वैत बंध आहे!

चंद्रभागेमध्ये स्नान करताना आपल्या शेजारी स्नान करणारी कोणी सुंदर ललना (स्त्री) आहे की सुरकुत्या पडलेली म्हातारी... याने वारकऱ्याच्या मनाला काहीच फरक पडत नाही! कारण महादेव जेव्हा तिसरा डोळा उघडतात, तेव्हा कामदेव भस्म होते; पण जेव्हा वारकरी आपला 'भक्तीचा तिसरा डोळा' उघडतो, तेव्हा त्याला संपूर्ण विश्वामध्ये केवळ आणि केवळ 'पांडुरंग हरी' दिसतो! त्याला सर्व जग साक्षात विठ्ठलमय भासते! त्याला 'काम' मारावा लागत नाही, तो कामदेवच येतो हरीकीर्तनकात आणि नाचतो धुंद होऊन भक्ती रसामध्ये.

अशी ही वारी म्हणजेच... शरीर, मन आणि बुद्धीच्या मर्यादा ओलांडून त्या अंतहीन, शुद्ध चैतन्याशी एकनरुप होणारी एक जीवंत अनुभूती आहे!

अजून काय लिहावे?
आता काही देवा नाही अन्य मागणे
मन तृप्त झाले आहे तुझ्या दर्शने
'पांडुरंग हरी' किंवा 'राम कृष्ण हरी' लिहा.

# कर्जमुक्ती आता अधिक व्यापक

शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे याविषयी ही माहिती...

शेतकरी बांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना' हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे.

राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल.

महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्?ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

## * स्वस्थ आरोग्य

# पनीर : आजारांचे सर्वात मोठे कारण आहे

माणसाने स्वतःला कितीही आधुनिक बनवले, तरी त्याला त्याच्या जुन्या ज्ञानाकडे परत जावेच लागेल. कारण आधुनिक विज्ञान अपूर्ण आहे आणि प्राचीन संशोधन पूर्णपणे परीक्षित आणि हानिरहित आहे.

आता बोलूया आजच्या सर्वात प्रसिद्ध अन्नाबद्दल म्हणजेच पनीरबद्दल भारतीय लोक पनीरचे इतके वेडे झाले आहेत की, जिथे कुठे ते मिळेल तिथे बाकीचे सर्व सोडून आनंदाने फक्त पनीर खाणे सुरू करतात. जेव्हा ते हॉटेलमध्ये जातात, तेव्हा पनीर खाल्ल्याशिवाय घास खाली उतरत नाही. कढई पनीर, शाही पनीर, मटर पनीर, चिली पनीर आणि पनीरचे बरेच प्रकार.

समोशामध्ये पनीर, पकोड्यांमध्ये पनीर, पिझ्झामध्ये पनीर, बर्गरमध्ये पनीर, म्हणजेच जिथे पाहावे तिथे पनीरच पनीर आहे. भारत जितके दुधाचे उत्पादन करतो, त्यापेक्षा कदाचित जास्त पनीरचे उत्पादन करतो.

जेव्हा आम्ही याचा सखोल तपास केला, तेव्हा आम्हाला समजले की... आयुर्वेदात पनीरचे वर्णन सर्वात वाईट अन्न म्हणून केले गेले आहे. कचरा मानला गेला आहे. आणि कचराही असा की तो प्राण्यांनाही खाऊ घालण्यास मनाई आहे.

पनीर दुधाला नासवून किंवा त्याचे रूप विकृत करून बनवले जाते. उदाहरणार्थ, जर एखादी भाजी सडली, तर ती आपण



खाऊ का? पनीर म्हणजे सुद्धा सडलेले दूधच आहे.

भारतीय इतिहासात कुठेही पनीरचा उल्लेख नाही, तसेच हा भारतीय पदार्थ नाही. कारण भारतात प्राचीन काळापासून दूध नासवण्यावर किंवा खराब करण्यावर बंदी आहे. आजही ग्रामीण समाजात घरातील महिला कधीही स्वतःहून दूध नासवत नाहीत.

**पनीर खाण्याचे तोटे...**

आयुर्वेदाने सुरुवातीपासूनच सांगितले आहे की खराब झालेले दूध लिव्हर (यकृत) आणि आतड्यांना नुकसान पोहोचवते. पण आता आधुनिक विज्ञानानेही आपल्या संशोधनात सिद्ध केले आहे की पनीर खाल्ल्याने आतड्यांवर अतिरिक्त दाब पडतो, ज्यामुळे पचनाचे आजार होतात.

प्राण्यांमध्येही पनीरमध्ये असणारे प्रोटीन पचवण्याची क्षमता नसते. मग माणूस ते कसे पचवणार? याचा परिणाम म्हणजे भयंकर बद्धकोष्ठता, फॅटी लिव्हर आणि नंतर हाय कोलेस्ट्रॉल, हाय ब्लड प्रेशर आणि डायबिटीस. हे पनीर पोटाचा धोकादायक आजार खइड (इरिटेबल बॉवेल सिंड्रोम म्हणजेच संवेदनशील आतड्यांचा आजार) चे कारण देखील बनते.

जास्त पनीर खाल्ल्याने रक्ताच्या गाठी तयार होतात, ज्यामुळे ब्रेन हॅमरेज आणि हार्ट फेल्युअर देखील होऊ शकते. त्याच वेळी, हे पनीर हार्मोनल असंतुलनाचे कारण देखील बनू शकते, ज्यामुळे हायपोथायरॉईडीझम किंवा हायपरथायरॉईडीझम (थायरॉईडचे आजार) देखील होऊ शकतात. महिलांची गर्भधारणा करण्याची क्षमता कमी होते आणि पुरुष नपुंसकतेचे बळी ठरतात. एकंदरीत विचार केला तर पनीर फक्त जिभेला चव देते पण संपूर्ण शरीराचे नुकसान करते. त्यामुळे पुढच्या वेळी पनीर खाण्यापूर्वी नक्की विचार करा.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : १२ लाख ‘बहिणीं’ना वगळल्याने नवा वाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेतील ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चावर 'कॅग'ने ताशेरे ओढल्यानंतर आणि या योजनेतून तब्बल ९२ लाख महिलांना वगळण्यात आल्याच्या चर्चेने खळबळ उडाली होती. त्यातच बीड जिल्ह्यातील अपात्र महिलांच्या मोठ्या आकडेवारीवरून सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. याबाबत आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले असून, पात्र आणि अपात्र महिलांची नेमकी आकडेवारी समोर ठेवली आहे. अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, ऑगस्ट २०२५ पासून या योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. यासाठी महिलांना तब्बल ६ महिन्यांची मुदत देण्यात आली होती, तर त्रुटी दूर करण्यासाठी एप्रिलपर्यंतचा वेळ देण्यात आला होता. वारंवार संधी देऊनही अनेक महिलांनी या प्रक्रियेची पूर्तता न केल्याने त्यांना योजनेतून बाद करण्यात आले आहे. ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, मात्र तरीही त्यांना लाभ मिळालेला नाही, अशा तक्रारींची सध्या प्रशासनाकडून युद्धपातळीवर पडताळणी सुरू असल्याचेही अदिती तटकरे यांनी नमूद केले. या ‘बहिणी’ ठरल्या अपात्र – योजनेची ई-केवायसी प्रक्रिया ऑगस्ट २०२५ पासून सुरू करण्यात आली होती. यासाठी देण्यात आलेली मुदत व वाढीव संधी देऊनही ६० लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली नाही. – आयकर विभागाच्या डेटा पडताळणीमध्ये ५ लाख महिलांचे कुटुंब करदाते असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या अपात्र ठरल्या. – ज्या महिलांच्या पतीचे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, अशा १४ ते १५ लाख महिलांचा डेटा समोर आल्याने त्यांना वगळण्यात आले.

## चेंबूर प्रकरणातील अहवाल हा चोरांना वाचवण्याचा प्रयत्न, दोषींना मनसे धडा शिकवणार

### संदीप देशपांडेंचा इशारा : आता महाराष्ट्राची बदनामी होत नाही का?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – चेंबूर दुर्घटना प्रकरणी आलेला अहवाल म्हणजे चोरांनी चोरांच्या चोरीची चौकशी करून, चोरांना दोषमुक्त करण्यासाठी वरिष्ठ चोरांना सादर केलेला अहवाल. अशाच चोरांमुळे महाराष्ट्राची बदनामी होतेय. चोरांना मनसे धडा शिकवणार, हा शब्द. यासाठी जबाबदार असलेल्या पालिका अधिकारी परदेशींचं निलंबन का झालं नाही? या गोष्टींमुळे महाराष्ट्राची बदनामी होत नाही का? असा संतप्त सवाल करत मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी पालिका आयुक्त आणि महापौर यांच्यावर टिका केली आहे. मुंबई शहरातील चेंबूर येथील डायमंड गार्डन परिसरात ३० जून रोजी शाळेच्या बसवर पिंपळाचे झाड उन्मळून पडून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी नियुक्त चौकशी समितीने आपला अहवाल महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे सादर केला आहे. या अहवालात झाडांच्या सुरक्षेसाठी नेमलेल्या कंत्राटदारावर ५ लाख रुपये, तर देखरेख करणाऱ्या सल्लागार संस्थेवर २ लाख रुपयांचा दंड करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच झाडांच्या सुरक्षिततेसाठी मानक कार्यपद्धती तयार करून ती तातडीने लागू करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत.

## अंजनगाव बारी येथे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातर्फे मोफत आरोग्य शिबीर संपन्न : ७० रुग्णांची तपासणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), अमरावती अंतर्गत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या संयुक्त विद्यमाने अंजनगाव बारी येथे नुकतेच भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नराटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय उपचार व सल्ला जागेवरच उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

या विशेष तपासणी शिबिरामध्ये परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात कर्करोग, हृदयरोग, मेंदूरोग, बालरोग यांसारख्या गंभीर आजारांसह लघवी व किडनी संबंधित विकार, किडनी प्रत्यारोपण, प्लास्टिक सर्जरी आणि कान-नाक-घसा संबंधित आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली. तसेच एन.सी.डी. अंतर्गत येणाऱ्या रुग्णांचेही स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली, ज्यापैकी पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या ६ रुग्णांना अमरावती येथील मुख्य विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे. या रुग्णांवर पुढील सर्व उपचार शासकीय योजनांतर्गत मोफत केले जाणार आहेत.




शिबिरामध्ये रुग्णांना सेवा देण्यासाठी रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ.सपना गुप्ता, वैद्यकीय अधिकारी डॉ.रिंकुजय केचे, शिबीर समन्वयक अधिकारी भूपेंद्र जेवडे, अधिपरिचारिका कशिश दामले, अधिपरिचारक मिलिंद भगत, फार्मासिस्ट प्रतिमा राठोड, रुग्णवाहिका चालक दीपक शर्मा, कक्षसेवक अभिजीत उदयकर आणि आरोग्य सेविका सुजाता रोंडगे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

## पावसाच्या खंडात सोयाबीन उत्पादकांनी घाबरु नये

### कृषी संशोधन केंद्राचा सल्ला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्ह्यात जून अखेरीस पेरणी झालेल्या सोयाबीन पिकाची अवस्था सध्या १२ ते १५ दिवसांची असून, गेल्या ५ ते ६ दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता, कोणत्याही महागड्या फवारण्या न करण्याचे आवाहन अमरावती प्रादेशिक संशोधन केंद्र ( डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ) मार्फत कळिवण्यात आले आहे.

या संवेदनशील काळात जमिनीतील ओलावा टिकवणे आणि मुळांची वाढ चांगली ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जमीन वाफशावर असल्यास शेतकऱ्यांनी उथळ डवरणी व कोळपणी करावी; ज्यामुळे वरचा पापुद्रा फुटून तणांचे नियंत्रण होईल आणि जमिनीतील ओलावा टिकून राहील. संरक्षित सिंचनाची सोय असल्यास व रोपे दुपारी कोमेजू लागल्यास हलके स्प्रिंकलर सिंचन द्यावे. ३-४ दिवसांच्या खंडासाठी टॉनिक किंवा १९:१९:१९ ची गरज नाही, मात्र पाण्याचा ताण ७ ते १० दिवसांपेक्षा वाढल्यास १ टक्के पोटॅशियम नायट्रेट किंवा १९:१९:१९ ची सकाळी किंवा संध्याकाळी फवारणी करावी. तीव्र ताण व जास्त तापमान असताना तणनाशकांचा वापर टाळावा.

दुसरीकडे, ज्या भागात अत्यल्प पावसामुळे अद्याप पेरणी झालेली नाही, तिथे उशिरात उशिरा २३ जुलैपर्यंत सोयाबीन पेरता येईल. मात्र, यामुळे उत्पादनात १५ ते २० टक्के घट होऊ शकते. अशा वेळी जे एस २०-३४, जे एस ९५-६०, पिडीकेव्ही अंबा, एमएयूएस ७२५ यांसारख्या लवकर येणाऱ्या वाणांची निवड करावी.

हेक्टरी रोपांची संख्या राखण्यासाठी दोन ओळींत ३० से.मी. अंतर ठेवून, बियाणे दर वाढवावा आणि पेरणी बीबीएफ किंवा पट्टा पद्धतीनेच करावी. सोयाबीनमध्ये तुरीचे आंतरपीक घेणे फायदेशीर ठरेल. जर २५ जुलैपर्यंत पेरणी शक्य झाली नाही, तर शेतकऱ्यांनी सोयाबीनची लागवड न करता सूर्यफूल किंवा मका या पर्यायी पिकांची निवड करावी, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

## राम मंदिर देणगी तपासाचा अहवाल द्या : सर्वोच्च न्यायालयाचे एसआयटीला निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – अयोध्या येथील राम मंदिराला मिळालेल्या देणगीच्या रकमेमध्ये झालेल्या अपहाराच्या चौकशीसाठी उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाला (एसआयटी) सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी या प्रकरणाचा स्टेटस रिपोर्ट (सद्यस्थिती अहवाल) सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने या देणगी 'गैरव्यवहार' प्रकरणाची निष्पक्ष आणि वेळेत चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना 'श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट', केंद्र आणि राज्य सरकारवर नोटीस बजावली असून सीसीटीव्हीचे संरक्षण करण्यासही सांगितले आहे.

या प्रकरणात तीन वेगवेगळ्या याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.

तसेच, राम मंदिराच्या कामकाजाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या 'श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट'च्या आर्थिक व्यवहारांचे कॅग (नियंत्रक आणि महालेखापरीक्षक) कडून ऑडिट (लेखापरीक्षण) करण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

'सीईओ'साठी अर्ज मागवले अयोध्या : श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने अयोध्येतील राम मंदिराचे कामकाज पाहण्यासाठी पहिल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची (सीईओ) नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे.

## पायधुणीत ८ वर्षीय चिमुकलीवर सुरक्षारक्षकाकडून लैंगिक अत्याचार

### संतप्त नागरिकांकडून कठोर कारवाईची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे काही महिन्यांपूर्वी चार वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपीला अल्पावधीतच न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. मात्र, त्यानंतरही महिलांवरील आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसल्याचे चित्र आहे. अशातच आता दक्षिण मुंबईतील पायधुनी परिसरात आठ वर्षीय चिमुरडीवर सुरक्षा रक्षकाने शौचालयात कथित लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना रविवारी उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, घटनेनंतर परिसरात संतप्त नागरिकांनी आंदोलन केले. शौचालयात नेऊन कथित लैंगिक अत्याचार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पायधुनी परिसरातील एका शौचालयात सुरक्षा रक्षकाने आठ वर्षीय मुलीवर कथित लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर मुलीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.



### स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू विद्यालयात

## इंग्रजी भाषा विषयावर सेमिनार : प्रा.डॉ.मो.अय्युबखान यांचे मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – स्थानिक मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदूरजनाघाट द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे इंग्लिश इज द एजीएस्ट लँग्वेज ऑफ द वर्ल्ड या विषयावर एक दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी वुमन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स नागपूरचे इंग्रजी विभाग प्रमुख व प्रसिद्ध शैक्षणिक तज्ञ डॉक्टर अय्युब खान यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मील्लत सोशल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अब्दुल शकील होते. अध्यक्षीय भाषणातून अब्दुल शकील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाची आवश्यकता व पाहूण्याचा परिचय करुन दिला. इंग्लिश इज द इजीएस्ट लँग्वेज ऑफ द वर्ल्ड या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.खान यांनी सांगितले की आपण आपली मातृभाषा जपली पाहिजे आणि तिचा आदर केला पाहिजे. मी उर्दू माध्यमातून शिकलो असून माझी मातृभाषा चांगली होती म्हणून मला इंग्रजी आत्मसात करता आली, परंतु करिअर, उच्च शिक्षण, आणि जागतिक संवादासाठी इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक आहे .इंग्रजी ही कोणत्याही एका संस्कृतीचे प्रतीक नसून ती संधीचे एक साधन आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाला विद्यार्थी सर्व शिक्षक आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तराचे सत्र घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन नइम अहमद यांनी तर आभार प्रदर्शन नईम शेख जरुडकर यांनी केले.

## जलतरणपटू गीताने केली ‘इंग्लिश खाडी’ पार




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुण्याची २१ वर्षीय जलतरणपटू गीता मालुसरे ही भारताची जलपरी म्हणून ओळखली जाते. जेलीफिशच्या विषारी हल्ल्यामुळे हात निकामी होण्याच्या मार्गावर असताना आणि तब्बल ११ शस्त्रक्रियांच्या असह्य वेदनांवर मात करत तिने अवघ्या १४ तास ३१ मिनिटांत ५४ किलोमीटर लांबीची 'इंग्लिश खाडी' पोहून पार करण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे. अवघ्या तिसऱ्या वर्षी जलतरणाला सुरुवात केलेल्या गीताने लहानपणापासूनच आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली.

### न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या इको क्लब व एनसीसी कॅडेट्सचा

## ‘कापडी पिशवी वापरा, प्लास्टिक टाळा’ जनजागृती अभियान



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री.शिवाजी शिक्षण संस्था संचालित न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल, वरुड येथे इको क्लबच्या माध्यमातून ‘कापडी पिशवी वापरा, प्लास्टिक टाळा’ या विषयावर जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले.

पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थ्यांनी शहरातील विविध भागातून जनजागृती रॅली काढली.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम नागरिकांना समजावून सांगितले. तसेच कागदी व कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करत स्वतः तयार केलेल्या आकर्षक कापडी पिशव्यांचे प्रदर्शन आणि वाटपही करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या प्रभावी घोषणाबाजीमुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले असून अनेकांनी यापुढे खरेदीसाठी कापडी पिशवीचा वापर करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या अभियानातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. मुख्याध्यापक अश्विन पोच्छी यांच्या मार्गदर्शनाखाली इको क्लब, एनसीसी विभाग, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा का नाही? उद्धव ठाकरेंचा सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला पाठिंबा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई –** नीट पेपरफुटीमुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात गेले असून विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. पण सरकारला इतर पक्ष फोडण्यातून वेळ मिळत नाही, अशी टीका करत एखाद्या व्यक्तीकडून एखादे काम नीट होत नसेल तर त्या व्यक्तीला बदलण्यात सरकारला कमीपणा वाटतो? असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी येथे केला. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन तिथे एखाद्या सक्षम व्यक्तीची नियुक्ती करावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

उद्धव ठाकरे यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेत दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या सोनम वांगचूक आणि 'कॉकरोच पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. देशभरातील विरोधी पक्षांनी, सर्व विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करत ठाकरे यांनी भाजप आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४६१/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कमला रामेश्वर मेटकर, वय अं.७९ वर्ष, धंदा-गृहिणी, २) अशोक रामेश्वर मेटकर, वय अं.५९ वर्ष, धंदा- मजुरी, ३) प्रदिप रामेश्वर मेटकर, वय अं.४७ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, ४) आशा मनोहर जानुस्कर, वय अं.६१ वर्ष, धंदा- घरकाम, रा.अमरावती, ५) उषा विजय पांडे, वय अं.४९ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.मुगनापार, ६) अनिता सुनिल ठाकरे, वय अं.५१ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.लोणखैरी, ७) सुनिता संजय चोरे, वय अं.५१ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.कचारी सावंगा, ८) सुधाकर रामचंद्र मेटकर, वय अं.६३ वर्ष, धंदा- शेती, रा.वरुड

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत अलोकी दाजीबा मेटकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७०/२०२६ ने.ता.११/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) ललीता सुरेश उईके, वय अं.५८ वर्ष,धंदा-मजुरी
२) हरीश सुरेश उईके, वय अं.३२ वर्ष, धंदा-मजुरी
३) सौ.अरुणा सचिन कोकोडे, वय अं.२५ वर्ष, धंदा-घरकाम
अर्जदार क्र.१ व २ रा.लोहंद्रा, पो.पुसला, ता.वरुड जि.अमरावती, क्र.३ रा.गुंजरखेडी, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे सुरेश उपाशा उर्फ उपासराव उईके, रा.लोहंद्रा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.११/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४६२/२०२६ ने.ता.२१/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) हरिभाऊ पांडुरंग गाडबैल, वय अं.६८ वर्ष,धंदा-सेवानिवृत्त
२) दिलीप पांडुरंग गाडबैल, वय अं.५८ वर्ष, धंदा- शेती
अर्जदार क्र.१ रा.नागपूर, ता.जि.नागपूर, क्र.२ रा.गव्हाणकुंड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे हीराबाई पांडुरंग गाडबैल, रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२१/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५८२/२०२६ ने.ता.२०/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती भारती मधुकर गुल्हाणे, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम, २) किरण मधुकर गुल्हाणे, वय अं.२४ वर्ष, धंदा- घरकाम, ३) शितल संदिप शिरभाते, वय अं.२६ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.३ रा.गणोजादेवी,ता.भातकुली, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे मधुकर गुलाब गुल्हाणे, रा.मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२०/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# होर्मुझमधून जायचं असल्यास आम्हाला २० टक्के टोल द्यावा लागणार, डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा, इराणकडून अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले सुरुच

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली –** अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष होर्मुझच्या सामुद्रधुनीवरुन पुन्हा वाढला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरुन पुन्हा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझची सामुद्र धुनीसंदर्भात एक वक्तव्य केलं आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अमेरिकेचं वर्चस्व असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं. ट्रम्प यांचा दावा इराणला थेट आव्हान मानलं जातंय. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली आहे. ती इराणसोबत असताना खुली असेल किंवा इराण सोबत नसलं तरी खुली असेल, असं ट्रम्प म्हणाले. इराणची नाकेबंदी पुन्हा लागू केलीय, असं ट्रम्प म्हणाले. इराण सोडून इतर देशांसाठी मार्ग खुला डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की इराणची नाकेबंदी केल्याचं म्हटलंय, इराणची जहाजं आणि त्यांच्या ग्राहकांची जहाजं रोखली जायची. होर्मुझची सामुद्रधुनी निष्पक्षपणे खुली असून त्याचा वापर सुरु आहे, असं ट्रम्प म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीचा संरक्षक म्हणून अमेरिका काम करणार असल्याचं म्हटलं. होर्मुझच्या सामुद्रधुनीला निष्पक्षपणानं सुरक्षित ठेवण्यासाठीच्या खर्चासाठी प्रत्येक जहाजावर २० टक्के दरानं टोल आकारला जाईल, असं ट्रम्प म्हणाले. ही प्रक्रिया लगेचच आणि तातडीनं सुरु होईल, असं ट्रम्प म्हणाले आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४१०/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती हलीमाबी रियाजोद्दीन काझी, वय अं.६०वर्ष, धंदा-घरकाम, २) फिरोजोद्दीन काझी रियाजोद्दीन काझी, वय अं.५१ वर्ष, धंदा- मजुरी, ३) शाहजाहबी जाकिरोद्दीन काझी, वय अं.४५ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे रियाजोद्दीन कयामोद्दीन काझी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०९/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) ज्ञानेश्वर बाबारावजी बुरंगे, वय अं.६९ वर्ष, धंदा-मजुरी
२) विवेक ज्ञानेश्वर बुरंगे, वय अं.४० वर्ष, धंदा- मजुरी
३) गौरव ज्ञानेश्वर बुरंगे, वय अं.३७ वर्ष, धंदा- मजुरी
अर्जदार क्र.१ ते ३ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे प्रतिभा ज्ञानेश्वर बुरंगे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७५/२०२६ ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती वैजयंती दिलीप अकर्ते, वयअं.६५वर्ष,धंदा-घरकाम
२) निलम चैतन्य तरार, वय अं.३८ वर्ष, धंदा- नोकरी
३) दिपिका सुधीर बोबडे, वय अं.४० वर्ष, धंदा- नोकरी
अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
क्र.३ रा.न्य नरसाळा नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे दिलीप सदाशिव अकर्ते, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५८४/२०२६ ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) कीर्ती सुधिर दवंडे, वय अं.४० वर्ष, धंदा-घरकाम
२) श्रेयस सुधिर दवंडे, वय अं.१६ वर्ष, धंदा- शिक्षण
३) रेयांश सुधिर दवंडे, वय अं.७ वर्ष, धंदा- शिक्षण
सर्व रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती (अर्जदार क्र.१ स्वत: करीता व अर्जदार क्र.२,३ करीता अ.पा.क)
४) मिरा व्यंकट दवंडे, वय अं.७५ वर्ष, धंदा- घरकाम रा.इसंबरी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत सुधिर व्यंकटराव दवंडे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# नागपूरमधील 3 बड्या हॉटेल्सवर एफडीएची कारवाई

## किचनमध्ये प्रचंड अस्वच्छता अन उंदरांचं साम्राज्य

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**नागपूर** – अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा धडाका सुरूच असून भेसळ करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. याच तुकाराम मुंढेंच्या कारवाईचा 'इफेक्ट' आता उपराजधानी नागपुरात पाहायला मिळाला आहे. किचनमध्ये अस्वच्छता आढळल्याने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने नागपूरमध्ये तीन बड्या हॉटेलचे परवाने रद्द केले आहते. यात काटोल




रोडवरील इंडियन तंदूर, द हट फॅमिली रेस्टोरेंट जगदीशनगर आणि फॅमिली गार्डन रेस्टोरेंट, फेटरी या तीन हॉटेल्सचा समावेश आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीत या हॉटेलच्या किचनमध्ये मोठ्याप्रमाणे उंदीर आढळून आले, सोबतच घाणीचे साम्राज्य देखील होते. त्यामुळे विभागाने तात्काळ कारवाईचा बडगा उगारत हॉटेलचे परवाने रद्द केले आहते.

# दोन्ही राष्ट्रवादीत अस्वस्थता : सुनेत्रा पवार गटाला कुरबुरींचे, तर शरद पवार गटाला फुटीचे ग्रहण?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाला फुटीचे, तर उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्या गटाला कुरबुरींचे ग्रहण लागल्याचे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे.

सुनेत्रा पवार यांच्या गटात अंतर्गत कुरबुरींना सुरुवात झाली असतानाच आता त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या नियुक्तीलाच आव्हान देऊन नव्याने निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, ठाकरे गटाच्या फुटीर



खासदारांप्रमाणेच आपल्या मतदारसंघात अधिकचा निधी मिळावा यासाठी शरद पवार गटातील काही आमदार, खासदार सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला जाण्यास आतूर झाल्याचीही चर्चा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर पक्षातील संघटनात्मक मतभेद आता समोर येऊ लागले आहेत. सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर आणि पार्थ पवार यांच्याकडे संघटनात्मक जबाबदाऱ्या वाढल्यानंतर पक्षातील ज्येष्ठ नेते आणि पवार कुटुंब यांच्यात मतभेद निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. तसेच, अजित पवार यांच्या आक्रमक राजकीय वाटाघाटीच्या शैलीअभावी भारतीय जनता पक्षाच्या छायेत राष्ट्रवादी झाकोळली जाईल, अशीही भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, ठाकरे गटाचे खासदार, आमदार शिंदे गटात गेल्याने त्यांच्या मतदारसंघात आता पुरेसा विकास निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## दिनविशेष

**१९१० : 'विल्यम हॅना' – टॉम अँड जेरीची चित्रे काढणारा चित्रकार यांचा जन्म.**

## सोने-चांदीचे दर

२४.कॅ सोने –१४२९१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने –११३००० रु.(१०ग्रॅम)

चांदी – २,३५,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

# पदोन्नतीचा निर्णय रद्द करण्याच्या हालचाली

## मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची भावना

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सरकारी अधिकारी–कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचा २९ जुलै २०२५ चा शासन निर्णय रद्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाने विधि आणि न्याय विभागाच्या खांद्यावर बंदूक ठेवून हा शासन निर्णय रद्द करण्याचा घाट घातल्याचे समजते. या निर्णयामुळे मागासवर्गीय अधिकारी–कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे.

मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे आरक्षित पदावर नियुक्त झालेल्या अधिकारी आणि



कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत २९ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने शासन निर्णय जारी करण्यात आला होता.

या शासन निर्णयानुसार पोलीस उपनिरीक्षक आणि वन खात्यातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाल्या. मधल्या काळात या शासन निर्णयाला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात आव्हान देण्यात आल्यानंतर न्यायाधिकरणाकडून तो रद्द केला गेला.

# शहरांच्या विकासासाठी 'अर्बन चॅलेंज फंड' निर्माण करा

## मुख्यमंत्री फडणवीस यांची सूचना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शहरांना विकासाचे केंद्र मानून त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून विकास करण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केली. शहरांच्या सर्जनशील विकासासाठी या अभिनव अभियानामुळे नागरी पायाभूत सुविधा आणि सेवा वितरणात लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत अर्बन चॅलेंज फंड अभियानाच्या



आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करताना महाराष्ट्राने या दृष्टीने पावले टाकली असून यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेत या धर्तीवर निधी उभारणी करून पाणीपुरवठा आणि स्वच्छतेसाठी निधी उभारल्याची माहिती दिली.

**९० हजार कोटींचा निधी प्रस्तावित**

बैठकीत अर्बन चॅलेंज फंडासाठीच्या वित्तीय आकृतीबंधाबाबत चर्चा करण्यात आली. अभियानात ९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित आहे. महाराष्ट्रासाठी केंद्र आणि राज्य शासन मिळून एकूण ४४ हजार ८०० कोटींच्या प्रकल्पांना चालना मिळू शकते, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

# जुहू येथे १० वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जुहू येथे महापालिकेच्या ताब्यातील एका भूखंडामध्ये असलेल्या खोल खड्ड्यात साचलेल्या पाण्यात मित्रांसमवेत पोहायला गेलेल्या दिनेश बसवराज हरिजन (१०) या मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.१३) दुपारी घडली.

सोमवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास जुहू, वायरलेस कंपाऊंड, डी. एन. नगर, जागृत हनुमान मंदिरामागे अंधेरी (पश्चिम) येथे एका खासगी जागेतील तलावात दिनेश बसवराज हरिजन (१०) हा मुलगा त्याच्या २–३ मित्रांसोबत पोहायला गेला होता. त्याला वाचविण्यासाठी



त्याच्या मित्रांनी आरडाओरड केली. मात्र तो न सापडल्याने अखेर पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांना मदतीसाठी बोलावण्यात आले. त्यांनी तलावात कसून शोध घेतल्यानंतर बुडालेला दिनेश बसवराज हरिजन (१०) या मुलाचा शोध लागला. त्याला तातडीने नजीकच्या कूपर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

